पुढारी

# हॉटेल्सकडून 'थर्टी फर्स्ट'चे बुकिंग रद्द होण्यास सुरुवात!

## थर्टी फर्स्टसाठी मुंबईकर गाठणार फार्म हाऊस, जवळचे रिसॉर्ट

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शासनाच्या आदेशानंतर मुंबई महापालिकेनेही नव्या वर्षाच्या स्वागतासाठी ठेवण्यात आलेल्या पार्ट्यांना मनाई करणारे आदेश जारी केले आणि हॉटेलचालकांनी पूर्वी केलेल्या थर्टी फर्स्टच्या पार्ट्यांचे बुकिंग रद्द करण्यास सुरुवात केली आहे. दुसरीकडे मुंबईतील पार्टीबंदी टाळण्यासाठी मुंबईकरांनी जवळचे फार्म हाऊस आणि रिसॉर्ट बुक करणे सुरू केले आहे.

या पार्टी बंदीने मुंबईकरांच्या उत्साहावरही विरजन पडले आहे. शिवाय या नव्या आदेशाचा मोठा फटका रेस्टॉरंट आणि हॉटेल उद्योगास बसला आहे.



मुंबईत सध्या रात्रीची जमावबंदी लागू करण्यात आली आहे.

मुंबईत पार्टीवर बंदी लादलेली असली, तरी मुंबईकर मोठ्या संख्येने मुंबईबाहेर जाताना दिसत आहेत. मुंबईनजीकचे फार्म हाऊस आणि रेसॉर्टचे बुकिंग कधीच फुल्ल झालेले आहे. उरले-सुरलेले मुंबईकर मध्यरात्री पार्टीसाठी हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये येतात. मात्र त्यावर निर्बंधांचे सावट असल्याने अनेकांनी बुकिंग घेतलेली नव्हती. त्यामुळे यंदाचे थर्टी फर्स्टही रेस्टॉरंट व हॉटेलचालकांसाठी म्हणावे तितके चांगले जात नसल्याचे म्हणता येईल, अशी प्रतिक्रिया हॉटेल मालकांच्या आहार संघटनेचे अध्यक्ष शिवानंद शेट्टी यांनी दिली.

हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष प्रदीप शेट्टी म्हणाले की, नव्या वर्षाच्या स्वागतासाठी ठेवलेल्या पार्टीचे बुकिंग रद्द केल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. परिणामी, हॉटेल व रेस्टॉरंटचालकांसह संपूर्ण उद्योगावर निराशेचे सावट आहे.

Mumbai Edition
Dec 26, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in